**<u>ठळक बातम्या</u>**

- प्रधानमंत्री नरेंद्र मोदी पुढच्या आठवड्यात राज्यात भाजपाच्या प्रचारमोहिमेचं रणशिंग फुंकणार
- राज्यात दुसऱ्या टप्प्यातल्या लोकसभा मतदारसंघांमध्ये उमेदवारी अर्ज भरण्याच्या प्रक्रियेला वेग
- राज्यातल्या धरणांमधला पाणीसाठा सरासरी ३० टक्क्यावर

**आणि**

- राज्यात उन्हाचा तडाखा वाढला, सोलापुरात पारा ४३ अंश सेल्सिअसवर

**<><><><><>**

लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी पुढच्या आठवड्यात राज्यात भाजपाच्या प्रचारमोहिमेचं रणशिंग फुंकणार आहेत. येत्या १० एप्रिलला रामटेक इथं त्यांची जाहीर सभा होणार आहे. त्यानंतर १४ एप्रिलला नागपूरमध्ये दीक्षाभूमी इथं डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन करुन ते चंद्रपूरला सभा घेणार आहेत. त्याव्यतिरिक्त भाजपाचे राष्ट्रीय अध्यक्ष जे. पी. नड्डा, केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्या देखील सभा होणार आहेत. भाजपा नेते आमदार प्रवीण दरेकर यांनी आज मुंबईत भाजपा कार्यालयात आयोजित वार्ताहर परिषदेत ही माहिती दिली.

भाजपाचे महाराष्ट्राचे प्रभारी डॉ. दिनेश शर्मा यांच्या अध्यक्षतेखाली महाराष्ट्र व्यवस्थापन समितीची आढावा बैठक आज झाली. निवडणूक प्रचाराची व्यूहरचना, प्रचार यंत्रणा त्याची अंमलबजावणी याबद्दल या आढावा बैठकीत सविस्तर चर्चा झाल्याचं दरेकर यांनी सांगितलं.

**<><><><><>**

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे वर्धा लोकसभा मतदार संघातले उमेदवार अमर काळे यांनी आज अर्ज भरला. स्वाध्याय मंदिरापासून जिल्हाधिकारी कार्यालयापर्यंत त्यांनी रॅली काढली. पक्षाध्यक्ष शरद पवार यांनी या रॅलीपूर्वी कार्यकर्त्यांना मार्गदर्शन केलं. परभणीमध्ये शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे उमेदवार संजय जाधव यांनी आज उमेदवारी अर्ज भरला. विविध मान्यवर यावेळी उपस्थित होते.

शिवसेनेचे बुलढाणा लोकसभा मतदारसंघाचे उमेदवार प्रतापराव जाधव यांनी आज उमेदवारी अर्ज भरला. यावेळी राज्याचे पाणीपुरवठा मंत्री गुलाबराव पाटील उपस्थित होते. त्यांच्याशिवाय शेतकरी नेते रविकांत तुपकर, रेखा पोफळकर, प्रताप पाटील, असलम शहा हसन शहा, मोहंमद हसन इनामदार यांनीही बुलडाण्यातून उमेदवारी अर्ज दाखल केले.

नांदेड लोकसभा मतदारसंघात मंगळवारी सहा अर्ज दाखल झाले. त्यात भारतीय जनता पक्षाचे प्रतापराव पाटील-चिखलीकर यांच्यासह राष्ट्रीय किसान पार्टीचे विष्णू जाधव, जगदीश पोतरे, सुरज कदम, नागोराव वाघमारे, नय्यर जहाँ मोहम्मद फेरोज हुसेन या अपक्ष उमेदवारांनीही आज अर्ज भरले. नांदेड मतदारसंघात आतापर्यंत एकूण ११ अर्ज दाखल झाले आहेत.

यवतमाळ-वाशिम लोकसभा मतदारसंघासाठी आज एकूण ४ उमेदवारांनी ७ अर्ज दाखल केले. त्यात शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाकडून संजय देशमुख यांच्यासह अनिल राठोड, संदीप शिंदे, मनोज गेडाम यांनी अर्ज भरले. आतापर्यंत या मतदारसंघात एकूण ५ उमेदवारांनी अर्ज भरले असून ७५ जणांनी १३२ अर्ज घेतले आहेत.

हिंगोलीतून आज शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे उमेदवार नागेश पाटील अष्टीकर यांनी अर्ज भरला. त्यांच्याशिवाय वसंत पाईकराव, नामदेव

कल्याणकर, रवि शिंदे, देशा बंजारा यांनीही आज अर्ज भरले. यापूर्वी २ उमेदवारांनी अर्ज भरल्यानं या मतदारसंघातल्या एकूण अर्जांची संख्या ७ झाली आहे.

**<><><><><>**

लोकसभा निवडणुकीत मतदानाचा टक्का वाढवण्याच्या उद्देशानं **लातूर**च्या जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांनी लातूर शहरातल्या असंघटीत कामगारांशी संवाद साधला. जागतिक ऑटीझम दिनानिमित्त आज लातूरमध्ये दिव्यांग विद्यार्थ्यांची प्रभातफेरी काढण्यात आली. या रॅलीत ३५० हून अधिक दिव्यांग विद्यार्थी सहभागी झाले होते. मतदानाचं महत्व पटवून देण्यासाठी लातूर जिल्ह्यात लोककला पथक, प्रभातफेरी, पालक मेळावे यासारखे विविध उपक्रम राबवले जात आहेत.

लोकशाही बळकट करण्यासाठी दिव्यांग मतदारांनीही आपला मतदानाचा हक्क बजवावा असं आवाहन **अहमदनगर**चे जिल्हाधिकारी सीध्दाराम सालीमठ यांनी केलं आहे. मतदार जागृतीसाठी अहमदनगर जिल्ह्यातल्या अकोले इथं आज काढलेल्या मोटरसायकल रॅलीला नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

मतदार यादीत नव्यानं समाविष्ट करण्यात आलेल्या युवकांनी मतदान करुन आपलं कर्तव्य पार पाडावं, असं आवाहन **नांदेड** जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी तसंच मतदान जनजागृती कक्षाच्या प्रमुख मिनल करनवाल यांनी केलं. मतदानाबाबत जनजागृती करण्याच्या उद्देशानं त्यांनी महाविद्यालयीन शिक्षण घेत असलेल्या नवमतदारांशी संवाद साधला.

मतदान जनजागृतीसाठी **रत्नागिरी** जिल्हा प्रशासन आणि रत्नागिरी नगर परिषदेच्या शाळा क्रमांक १५ च्या संयुक्त विद्यमाने विद्यार्थ्यांची साखळी आणि कलाकृती तयार करण्यात आली होती.

**<><><><><>**

ईडी, सीबीआय, आयटी हे भाजपचे तीन मित्रपक्ष आहेत, अशी टीका आदित्य ठाकरे यांनी केली आहे. यवतमाळ वाशिम लोकसभा मतदारसंघात महाविकास आघाडीचे उमेदवार संजय देशमुख यांचा उमेदवारी अर्ज दाखल करण्यात आला त्यावेळी झालेल्या सभेत ते बोलत होते.

युज अँड थ्रो ही भाजपची पॉलिसी आहे. हे सरकार इथले उद्योग गुजरातला पाठवित असल्यामुळे महाराष्ट्रातील युवकांना मिळणाऱ्या नोकऱ्या गेल्या आहेत, असंही आदित्य ठाकरे यावेळी म्हणाले. या सभेत आमदार रोहित पवार यांनी देखील पक्ष सोडून गेलेल्यांवर टीका केली. महायुतीत गेलेल्या आमदार खासदारांनी सत्तेसाठी विचार सोडला, जनतेला सोडलं, निष्ठा सोडली, असं रोहित पवार यावेळी म्हणाले.

**<><><><><>**

धुळ्यामध्ये बनावट मतदार ओळखपत्र तयार करणाऱ्या टोळीला पोलिसांनी जेरबंद केलं आहे. याप्रकरणी दोघांना अटक करण्यात आली आहे. धुळे पोलिस दलाच्या स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेच्या पथकाने मोहाडी उपनगरात एका फोटो स्टुडीओवर छापा टाकून बनावट मतदार कार्ड आणि साहित्य जप्त केलं.

या ठिकाणी १४ लोकांचे बनावट मतदार ओळखपत्र. मतदान कार्ड तयार करण्यासाठी लागणारा फोटो पेपर, संगणक प्रिंटर, मोबाईल असं एकूण ३५ हजार रुपयांचं साहित्य पोलिसांनी जप्त केले आहे.

**<><><><><>**

राज्यातल्या धरणांनी तळ गाठला असून धरणांमधला पाणीसाठा सरासरी ३० टक्क्यांवर आला आहे. जमिनीची पाणीपातळी खालावल्यानं टँकरची मागणी वाढत आहे. सध्या राज्यातल्या १५ जिल्ह्यांमधल्या २ हजार २३९ गावांसह २ हजार ७७९ वाड्या-वस्त्यांना १ हजार ५३२ टँकरद्वारे पाणीपुरवठा केला जात

आहे. रायगड जिल्ह्यात १३, पालघरमध्ये १३, धुळ्यात पाच, जळगाव जिल्ह्यात ५३, सोलापूर जिल्ह्यात ३८, अमरावतीत एक, बुलढाण्यात २७ टॅंकर सुरु आहेत. गेल्यावर्षी १ एप्रिल रोजी राज्यातल्या अवघ्या ५९ गावांमध्ये ६८ टॅंकर सुरु होते. यंदा मात्र साडेबाराशे गावांमध्ये सुमारे दीड हजारापेक्षा जास्त टॅंकर सुरु आहेत.

**<><><><><>**

राज्यात उन्हाचा तडाखा वाढत चालला आहे. सोलापूर शहरातलं तापमान सध्या ४३ अंश इतके झाले आहे. तापमानाचा पारा वाढू लागल्यानं जनजीवन विस्कळीत होऊ लागले आहे. उष्माघाताच्या रुग्णांवर उपचार करण्यासाठी जिल्ह्यातील ७७ प्राथमिक आरोग्य केंद्रांमध्ये उष्माघात कक्ष सुरू करण्यात आले आहेत. या आरोग्य केंद्रात उष्माघात कक्षासाठी स्वतंत्र रुम देण्यात आली आहे. त्यात प्रत्येक कक्षात रुग्णांसाठी बेड, कुलर, थंड पाण्याची व्यवस्था, फॅन यासह औषधोपचारासाठी आवश्यक असलेलं सर्व साहित्य उपलब्ध करून देण्यात आलं आहे. तसेच वाढत्या उष्णतेमुळे निर्माण होणाऱ्या आजारांसह होणारे दुष्परिणामां बाबत आरोग्य विभाग जन जागृतीही करीत आहे.

**<><><><><>**

रत्नागिरीतल्या २८ गावांमधले शिमग्याचे जुने वाद सामोपचारानं मिटवण्यात पोलिसांना यश आलं आहे. जिल्ह्यातल्या ३४ गावांमध्ये शिमगोत्सवातल्या पालखीवरून अनेक वर्षांपासून वादविवाद सुरू होते. हे वाद मिटवण्यासाठी यंदा रत्नागिरी जिल्हा पोलिसांनी पुढाकार घेतला. यात लांजा आणि खेड तालुक्यातल्या प्रत्येकी चार, गुहागर आणि संगमेश्वरमधल्या प्रत्येकी दोन, राजापूर, नाटे, देवरुख आणि चिपळूणमधल्या प्रत्येकी तीन गावांचा समावेश आहे. उर्वरित सहा गावांमध्ये कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये म्हणून मनाई आदेश लागू करण्यात आले आहेत.

**<><><><><>**

आयपीएल क्रिकेट स्पर्धेत, आज रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू आणि लखनऊ सुपर जायंट्स यांच्यात सामना होणार आहे. बंगळुरूच्या एम. चिन्नास्वामी स्टेडियमवर थोड्याच वेळात, म्हणजे साडेसात वाजता, हा सामना सुरु होईल.

रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूनं नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षण करायचा निर्णय घेतला आहे.

**<><><><><>**

श्रोतेहो, राज्यातल्या लोकसभा मतदारसंघातले उमेदवार, निवडणूक लढवण्यामागची त्यांची भूमिका, स्थानिक राजकारण यांचा आढावा घेणारा ‘लोकनिर्णय महाराष्ट्राचा’ हा कार्यक्रम, आकाशवाणीनं आपल्यासाठी सुरू केला आहे. कार्यक्रमाच्या आजच्या भागात रामटेक आणि **उद्याच्या** भागात आपण **चंद्रपूर** लोकसभा मतदार संघाचा आढावा घेणार आहोत. संध्याकाळी सव्वा सात ते साडे सात वाजेपर्यंत आकाशवाणी मुंबईच्या अस्मिता वाहिनीवर आणि समाज माध्यमांवर हा कार्यक्रम आपल्याला ऐकता येईल.

**<><><><><>**

कोकण, मध्य महाराष्ट्रात काही ठिकाणी, मराठवाडा, विदर्भात तुरळक ठिकाणी तापमानात किंचित वाढ झाली आहे.

येत्या दोन दिवसात सर्वत्र हवामान कोरडं राहण्याची शक्यता पुणे वेधशाळेनं व्यक्त केली आहे.

**//<><><><><>//**